# आमदार सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील यांच्या कार्याचा आढावा

### पर्यटन व तीर्थक्षेत्र विकास

१) महालक्ष्मी मंदीर परिसराच्या विकासासाठी शिर्डी संस्थान कडून ५० लाखांचा निधी मिळविला.
२) टेंबलाई मंदीर परिसर विकासासाठी २ कोटी २८ लााखाचा निधी मंजूर व प्रत्यक्ष कामास सुरूवात.
३) राजर्षी शाहू जन्मस्थळ विकास आराखडा अंतर्गत ८.५ कोटी प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे पाठपुरावा. नूतनीकरणासाठी १ कोटींचा निधी मंजूर
४) कोल्हापूरला तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा, यासाठी राज्य व केंद्राकडे पाठपुरावा.
५) वसगडे, वडणगे, गडमुडशिंगी, सांगवडे, सांगवडेवाडी, शिंगणापूर, निगवे खालसा, गोकुळशिरगांव या गावांचा 'क' वर्ग यात्रा स्थळांचा समावेश करुन ९८.७८ लाख निधी मंजूर व कामे प्रगतीपथावर. तसेच प्रयाग चिखली, खेबवडे, कात्यायणी गावांचा 'क' वर्ग यात्रा स्थळांमध्ये समावेश.

### रस्ते व ड्रेनेज

१) कोल्हापूर शहरातील ड्रेनेजसाठी ३१ कोटी ९८ लाख निधी मंजूर
२) शहराच्या सर्वांगीन विकासासाठी २२८ कोटींचा रस्ते विकास प्रकल्प राबविण्यासाठी पुढाकार व प्रत्यक्ष कामास सुरूवात.
३) लाईन बझार येथील पोलिस मुख्यालयातील जुन्या पोलिस लाईन मध्ये शौचालये व स्वच्छतागृहे बांधकामासाठी २ कोटी २४ लाख मंजूर व कार्यान्वित.
४) ग्रामीण भागातील रस्ते, साकव व मुलभूत सुविधांसाठी सार्वजनिक बांधकाम खाते व जिल्हा परिषदेच्या माध्यमातून १९ कोटींचा निधी.
५) आमदार फंड व डोंगरी विकास निधीतून रस्ते, गटर्स, सांस्कृतिक हॉल, व्यायामशाळा, स्वच्छतागृहे, संगणक मंजुरीसाठी ५ कोटी २२ लाख.
६) उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाकडून पाडळी खुर्द, शिये, मुडशिंगी, वसगडे, गांधीनगर, भामटे या गावांच्या मुलभूत सोयी सुविधांसाठी ४१ लाख ३३ हजार निधी मंजूर.
७) कोल्हापूर महानगरपालिका मुलभूत सेवा सुविधा विकासासाठी १३ कोटी विशेष अनुदान मंजूर करण्यात सहभाग.
८) कोल्हापूर शहरातील ई वॉर्ड साठी ४.८१ कोटींचे विशेष अनुदान मंजूरी करून आणले.

### शेती

१) करवीर मतदारसंघातील पुरग्रस्त शेतकऱ्यांना सानुग्रह व पीक नुकसान भरपाई (दोन वर्षात) ७ कोटी ७५ लाख ४२ हजार मिळवुन देण्यासाठी पुढाकार.
२) सरसकट कर्जमाफी व्हावी, यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा व शासनाकडे पाठपुरावा.
३) कोल्हापूरला गूळ निर्यात झोन होण्यासाठी केंद्र शासनाच्या 'अपेडा' या शिखर संस्थेकडे पाठपुरावा.
४) गूळासह इतर जीवनावश्यक वस्तू व्हॅट मधून वगळण्याबाबत व औषधावरील जकात व उपकर माफ करण्यासाठी अर्थमंत्र्यांकडे पाठपुरावा.

### पाणीपुरवठा

१) ई वॉर्डाला स्वच्छ व मुबलक पाणीपुरवठा होण्यासाठी ३० कोटी योजना मंजूर. त्यापैकी २७ कोटी निधी जमा व प्रत्यक्ष कामाला सुरूवात
२) करवीर मतदारसंघातील ग्रामीण भागात भारत निर्माण, महाजल, विशेष घटक योजना, वैज्ञानिक विकास कार्यक्रम दलित वस्ती सुधार, सेस फंड आदी योजनेअंतर्गत जिल्हा परिषदेच्या माध्यमातून २ कोटी ५१ लाख ५ हजार निधी मंजूर व काम सुरू कार्यान्वित करण्यासाठी पाठपुरावा.
३) शिंगणापूर बंधाऱ्याचा खचलेला भराव विशेष दुरूस्तीसाठी २ कोटी ८६ लाख निधी मंजूरीसाठी प्रयत्न.
४) राजाराम बंधारा पूरसंरक्षक कामासाठी १ कोटी ८८ लाख व दुरूस्तीसाठी ५२ लाख निधी मंजूर.

### समाज कल्याण

१) विभागीय जात पडताळणी कार्यालय कोल्हापूरात सुरू करण्यासाठी पुढाकार.
२) विचारे माळ येथे आंबेडकर संकुल बांधकामासाठी ४ कोटी ६२ लाख मंजूर.
३) आमदार फंडातून करवीर मतदारसंघाच्या दलित वस्त्यांमध्ये समाज मंदिरे, नळपाणी पुरवठा योजना, सामाजिक सभागृह उभारणी, रस्ते, गटर्स यासाठी ५० लाखांहून अधिक निधी खर्च.

### विशेष निर्णय

१) शाहू नगर, दौलत नगर, लक्षतिर्थ वसाहत येथील झोपडपट्टी प्रकरणे नियमानुकुल करण्यासाठी प्रयत्न.
२) म्हाडा गाळेधारकांकडून मुद्रांक शुल्क दुसऱ्यांदा वसूल न करता एकदाच शुल्क घ्यावे यासाठी शासनाकडे पाठपुरावा.
३) शहरातील ५४ झोपडपट्ट्यांपैकी ४४ घोषित व १० अघोषित आहेत. यातील ४४ घोषित पैकी १० झोपडपट्ट्यांमधून २२०६ झोपडपट्टीधारकांसाठी केंद्र शासनाच्या एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम योजनेअंतर्गत घरकुल बांधणी व मुलभूत सोयी सुविधांसाठी २४ कोटी ७५ लाखाचा निधी मंजुर व कार्यान्वित करण्यासाठी पाठपुरावा.
४) न्यु शाहुपूरी येथील एफ. एस. आय. दुप्पट करुन घेण्यासाठी मा. मुख्यमंत्र्यांकडे व शासनाकडे सतत मागणी. या प्रयत्नाला यश येऊन येथील घरांची उंची २१ मीटर (ग्राऊंड + ५ मजले) इतकी ठेवण्यासाठी मंजुरी (पुर्वी न्यु शाहुपूरीमध्ये ग्राऊंड + २ मजले अशी परवानगी होती).
५) कोल्हापूरातील सर्कीट हाऊस जवळील १० वर्षांपूर्वी कोट्यावधी रुपये खर्चून उभारलेले राज्य कामगार विमा योजना रुग्णालय (ईएसआयसी हॉस्पीटल) सुरू करण्यासाठी पुढाकार व त्यामध्ये यशस्वी. याचा लाभ जिल्ह्यातील २ लाख कामगारांना मिळणार.
६) कोल्हापूर शहरातील वकील व पक्षकारांच्या सोयीसाठी कार्यरत असणारे सहकार न्यायालय १ व २ इतरत्र न हलवता आहे तेथेच सुरू ठेवणे व सहकार अॅपीलेट न्यायालयाचे कायमस्वरुपी खंडपीठ कोल्हापूरला होण्याबाबत शासनदरबारी पाठपुरावा. न्यायसंकुल इमारत बांधकामासाठी निधी मिळविण्यासाठी शासनाकडे प्रयत्न.
७) असिस्टंट लेबर कमिशनर कार्यालय कोल्हापुरातील कार्यालयातमध्येच समाविष्ठ ठेवावीत, यासाठी पाठपुरावा.
८) रुपांतरीत कर, इनामी जमीन तसेच बी टेन्युअरच्या जाचक अटी शिथील करण्यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा.
९) नव्या वकीलांना व्यवसाय करात १० वर्षे सूट देणेबाबत प्रयत्न.
१०) कोल्हापूर बेंगलोर महामार्गाचे चौपदरीकरणामुळे सांगली फाटा, लक्ष्मी टेकडी, गोकुळ शिरगांव, उजळाईवाडी, नागांव, उचगांव, सरनोबतवाडी, शिये फाटा ही अपघात प्रवण क्षेत्र म्हणुन ओळखली गेली. नागरीकांच्या सोयीसाठी या ठिकाणच्या कामातील त्रुटी दूर करण्यासाठी प्रयत्न. त्यातील त्रुटी दूर करण्यासाठी पाठपुरावा.

### शैक्षणिक व सामाजिक

१) विवाहपूर्व एच. आय. व्ही. चाचणी सक्तीची करावी, यासाठी विधीमंडळात लक्षवेधी सूचना मांडली. याबाबत शासनाकडून विशेष समितीची नियुक्ती व चर्चा.
२) समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी हातभार म्हणून वाढदिवसानिमित्त शुभेच्छांच्या स्वरुपात वह्या स्विकारुन त्या विद्यार्थ्यांना वितरीत करण्याचा उपक्रम गेली ३ वर्षांपासून सुरू आहे. या उपक्रमांतर्गत गेल्या दोन वर्षात ६ लाख ५० हजार ८३३ वह्या एकत्र झाल्या व त्याचा लाभ १ लाख ५८ हजार ३०२ विद्यार्थ्यांना मिळाला. *२००९ या वर्षी ४ लाख ६६ हजार ५६४ वह्या एकत्र झाल्या. अशा प्रकारे* ***तीन वर्षात ११ लाख १७ हजार ३९७ वह्यांचा २ लाख ६४ हजार ८९१ विद्यार्थ्यांना लाभ झाला आहे.***
३) आमदार फंड व इतर निधीतून प्राथमिक शाळा व शासकीय कर्मचाऱ्यांना ४० लाखांचे संगणक वाटप.
४) मुख्यमंत्री सहायता निधीतून हृदय रुग्णांना मदत मिळवून देण्यामध्ये महाराष्ट्रात दुसरा क्रमांक.
५) समाजात एकत्र कुटूंब पद्धती जपली जावी यासाठी फायटर्स स्पोर्टस् क्लबच्या सहकार्याने 'आदर्श एकत्र कुटूंब पुरस्कारा'चे वितरण.
६) शिरोळ येथील पुरग्रस्तांना ८ टन धान्याचे वाटप.
७) दुष्काळग्रस्त भागातील जनावरांसाठी २५ ट्रक चारा पाठविला.
८) शासनाच्या संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी, श्रावणबाळ निराधार योजनेसारख्या अन्य योजना राबविण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न. आजवर या योजनांमधून १५६४ लाभार्थींना लाभ मिळवून दिला आहे.
९) मराठी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते गणपत पाटील यांना शासकीय कोट्यातून घरकुल मंजूर करुन देण्यात पुढाकार.
१०) डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पीटलतर्फे आयोजित शिबीरांच्या माध्यमातून ८२ हजारांहून अधिक रुग्णांवर अत्यल्प दरात उपचार.
११) वृक्षारोपण मोहिमेअंतर्गत करवीर तालुक्यातील शाळांमध्ये एकाच दिवशी १० हजारांहून अधिक झाडांचे वाटप.

**महिलांसाठी**

१) महिला स्वावलंबी व्हाव्यात व त्यांनी तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ देण्यासाठी **गृहिणी महोत्सव**ाचे गेल्या पाच वर्षांपासून यशस्वी आयोजन. सर्व स्टॉलधारकांना मोफत स्टॉल. महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन.
२) महिलांना सक्षम करण्यासाठी महिला प्रशिक्षण व बचत गटांना स्थापनेसाठी प्रोत्साहन व पाच हजारांहुन अधिक बचत गट कार्यरत.
३) ग्रामीण व शहरी भागात २५०० शिबीरांतून २५ हजारांहून अधिक महिलांना अत्यल्प शुल्कामध्ये पाककला, शिवणकाम अशा विविध विषयांचे प्रशिक्षण.
४) महिलांच्या आरोग्यविषयक जागृतीसाठी मोफत आरोग्य चिकीत्सा व निदान शिबीरांचे आयोजन.
५) महिलांच्या विविध समस्यांवर अभ्यासपूर्ण व्याख्यानांचे सातत्यपूर्ण आयोजन.

**औद्योगीक**

१) कोल्हापूरात फौंड्री क्लस्टर सुरू होण्यासाठी सातत्याने प्रयत्न.
२) कोल्हापूरात आय. टी. क्षेत्राचा विकास व्हावा यासाठी पुणे येथे मुख्यमंत्री, पालकमंत्री, उद्योगमंत्री व उद्योजक यांच्या कोल्हापूर आय टी अॅडव्हांटेज संयुक्त बैठकीचे आयोजन.
३) गोकुळ शिरगांव मुख्य रस्ता व अंतर्गत रस्ता व शिरोली एम. आय. डी. सी. अंतर्गत रस्ते स्ट्रीट लाईटसाठी५ कोटी ७९ लाख निधी मंजूर.
४) कोल्हापूरचा स्पेशल इकॉनॉमिकल झोन (SEZ) मध्ये समावेश होण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा.
५) बाबुभाई परीख पूल येथे रेल्वे क्रॉसींग ब्रीज उभारणीबाबत केंद्रीय रेल्वे अधिकारी व कोल्हापूर महानगरपालिका अधिकारी यांच्यासमवेत पाहणी व बैठक तसेच पाठपुरावा तसेच विक्रमनगर येथून टेंबे इंडस्ट्रिज येथे फुटब्रिज उभारणीसाठी मध्य रेल्वेकडे पाठपुरावा.

**क्रीडा**

१) विभागीय क्रीडा संकुल मंजुरीसाठी प्रयत्न व उभारणीसाठी १६ कोटी निधी मंजूर.
२) कसबा बावडा येथील क्रीडांगण शासनाकडुन महानगरपालिकेकडे हस्तांतरण व विकास कामांसाठी ८६ लाख निधी. लाईन बझार हॉकी मैदानाकरीता ७ लाख.
३) विविध क्रीडा प्रकारांमध्ये उल्लेखनिय कामगीरी करणाऱ्या क्रीडापटूंना सातत्याने मदत.
४) डॉ. डी. वाय. पाटील ट्रस्टच्या माध्यमातून राज्यस्तरीय कै. वाय. बी. पाटील स्मृतीचषक क्रीकेट स्पर्धांचे १९ वर्षांपासून आयोजन.
५) डॉ. डी. वाय. पाटील ट्रस्टच्यावतीने वर्षा पत्की, धनराज पिल्ले, तेजस्विनी सावंत, राधिका बराले, वीर धवल खाडे यांचा गौरव तसेच रमाकांत आचरेकर गौरव निधी क्रिकेट सामन्याचे यशस्वी संयोजन.
६) एव्हरेस्ट शिखर सर करणारी पहिली मराठी तरुणी कुमारी कृष्णा पाटील हिचा सत्कार.

**ट्रस्ट**

१) आजपर्यंत २० हजार १५४ ज्येष्ठ नागरीकांना मोफत ओळखपत्रे वितरीत करण्यात आली असून हा उपक्रम अविरत सुरू आहे.
२) असंघटीत क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी जनश्री विमा योजनेअंतर्गत ५ हजारांहून अधिक लोकांना लाभान्वित केले असून योजना अखंडपणे सुरू आहे.
३) पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे सातत्याने आयोजन.
४) हॉकी, क्रीकेट, आदी स्पर्धांचे नियमीत आयोजन
५) विद्यार्थी दत्तक योजना.
६) समाजातील गरजू विद्यार्थ्यांना फी मध्ये सवलत
७) उज्वल भविष्यासाठी करीअर गायडन्स फेअरचे आयोजन.
८) विद्यार्थ्यांसाठी बद्ध्यांक व कल चाचणी शिबीराचे आयोजन.
९) १० वी व १२ वी परिक्षेमध्ये गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार.
१०) एम. पी. एस. सी. व यु. पी. एस. सी. परिक्षेती यशस्वी उमेदवारांचा सत्कार.
११) समाजामध्ये मानसिक स्वास्थ्य कायम रहावे, यासाठी विविध आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन.